महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

# सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६

# मुंबई वैरण व धान्य नियंत्रण अधिनियम, १९३९

(१९ सप्टेंबर, २०११ पर्यंत सुधारित)

# Bombay Act No. XXVI of 1939

# The Bombay Fodder and Grain Control Act, 1939

*(As modified upto 19th September, 2011)*

*

**व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित**

**२०१३**

**(किंमत : रु. ४-००)**

# सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६

## मुंबई वैरण व धान्य नियंत्रण अधिनियम, १९३९

**अनुक्रमणिका**

**उद्देशिका.**

**कलमे.**


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | पृष्ठ |
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | ... | ... | ... | १ |
| २. | व्याख्या. | ... | ... | ... | १ |
| ३. | दुष्काळी व टंचाईची क्षेत्रे जाहीर करण्याचा व प्रमाण किंमती ठरविण्याचा अधिकार. | | | ... | १ |
| ४. | (१) प्रमाण किंमतीपेक्षा अधिक रक्कम वसूल न करणे. | ... | ... | ... | २ |
| | (२) विक्रेत्याने खरेदी करणाऱ्यास पावती देणे. | ... | ... | ... | २ |
| ५. | कोणत्याही स्थानिक क्षेत्रांतून वैरण किंवा धान्य काढून नेण्याची मनाई. | | ... | ... | २ |
| ६. | प्रमाण किंमतीपेक्षा अधिक रक्कम वसूल करता येणार नाही. | | ... | ... | २ |
| ७. | कलम ४ किंवा ५ याचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. | ... | ... | ... | २ |
| ८. | नियम. | ... | ... | ... | २ |

# सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६

## [मुंबई वैरण व धान्य नियंत्रण अधिनियम, १९३९][१] [१२ डिसेंबर, १९३९]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

* सन १९४१ चा मुंबई अधिनियम १७.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

महाराष्ट्र विधि अनुकूलन आदेश, १९६०.

**मुंबई प्रांतात दुष्काळाच्या किंवा टंचाईच्या प्रसंगी वैरण व धान्य यांचा पुरवठा व वाटप यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व त्यांचे नियमन करण्यासाठी तसेच, त्यांच्या किमतींचे नियमन करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मुंबई प्रांतात दुष्काळाच्या किंवा टंचाईच्या प्रसंगी वैरण व धान्य यांचा पुरवठा व वाटप यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व त्यांचे नियमन करण्यासाठी, तसेच त्यांच्या किमतीचे नियमन करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :--

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई वैरण व धान्य नियंत्रण अधिनियम, १९३९, असे म्हणावे.

(२) तो, [२][संपूर्ण मुंबई प्रांतास] लागू होईल.

(३) तो, राज्य शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जो दिनांक नेमील त्या दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात,--

(१) "दुष्काळी क्षेत्र" याचा अर्थ, कलम ३ अन्वये दुष्काळी क्षेत्र म्हणून जाहीर केलेले कोणतेही क्षेत्र, असा आहे ;

(२) "टंचाईचे क्षेत्र" याचा अर्थ, कलम ३ अन्वये टंचाईचे क्षेत्र म्हणून जाहीर केलेले कोणतेही क्षेत्र, असा आहे ;

(३) "प्रमाण किंमत" याचा अर्थ, कलम ३ अन्वये वैरण व धान्य यांच्या विक्रीसाठी ठरविलेली कमाल किंमत, असा आहे ;

दुष्काळी व टंचाईची क्षेत्रे जाहीर करण्याचा व प्रमाण किंमती ठरविण्याचा अधिकार.

**३.** (१) [३][राज्य] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, राज्यातील कोणत्याही स्थानिक क्षेत्रात [४][ज्यांना हा अधिनियम लागू आहे] दुष्काळी किंवा टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे असे वेळोवेळी जाहीर करण्याचा अधिकार आहे ; आणि त्यानंतर उक्त क्षेत्र, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, [३][राज्य] शासन निर्दिष्ट करील अशा मुदतीपर्यंत, यथास्थिति, दुष्काळी क्षेत्र किंवा टंचाईचे क्षेत्र आहे, असे समजण्यात आले पाहिजे.

(२) तसेच, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढून जाहीर करण्यात आल्यानंतर, [३][राज्य] शासनास, तशाच अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा दिनांकानंतर कोणत्याही प्रकारच्या वैरणीच्या किंवा धान्याच्या विक्रीबाबत करण्यात आलेले सर्व करार या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहतील असेही जाहीर करण्याचा अधिकार आहे.

(३) [३][राज्य] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, कोणत्याही दुष्काळी क्षेत्रात किंवा टंचाईच्या क्षेत्रात किंवा अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर क्षेत्रात वैरणीच्या किंवा धान्याच्या विक्रीसाठी प्रमाण किंमत ठरविण्याचा अधिकार आहे.

---

१ उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई शासन राजपत्र, १९३९, भाग ५, पृष्ठ ४४५, किंवा मुंबई विधानसभा वादविवाद, १९३९, खंड ५ पृष्ठ २३४२ किंवा मुंबई विधान परिषद वादविवाद, १९३९, खंड-८, पृष्ठ ४८४ पहा.
विधानसभेतील कामकाजाकरिता, मुंबई विधानसभा वादविवाद, १९३९ खंड-७, पृष्ठे ८२६-३३, ८६४-९४ व परिषदेतील कामकाजाकरिता, मुंबई विधान परिषद वादविवाद, १९३९, खंड-३, पृष्ठ ३१५-२२ पहा.

* हा अधिनियम सन १९४८ चा मुंबई अधिनियम ११, कलम २ अन्वये पुन्हा अधिनियमित करण्यात आला.

२ विधि अनुकूलन आदेश १९६० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ हा अधिनियम सन १९४८ चा मुंबई अधिनियम ११, कलम २ अन्वये पुन्हा अधिनियमित करण्यात आला.

प्रमाण किंमतीपेक्षा अधिक रक्कम वसूल न करणे.

**४.** (१) कलम ३, पोट-कलम (३) अन्वये ज्या कोणत्याही क्षेत्राबाबत कोणत्याही प्रकारच्या वैरणीची किंवा धान्याची प्रमाण किंमत ठरविण्यात आली असेल त्या क्षेत्रात, कोणत्याही व्यक्तीने अशा वैरणीच्या किंवा धान्याच्या विक्रीबद्दल प्रमाण किंमतीपेक्षा अधिक रक्कम वसूल करता कामा नये.

विक्रेत्याने खरेदी करणाऱ्यास पावती देणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही क्षेत्रात धान्याच्या किंवा वैरणीच्या प्रत्येक विक्रेत्याने किंवा त्याच्यावतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने धान्य किंवा वैरण विकल्यास, त्याने खरेदी करणाऱ्या व्यक्तीला पावती दिली पाहिजे व अशा पावतीत विक्रीचा मोबदला म्हणून त्यास मिळालेली रक्कम, तसेच विकलेल्या वैरणीचे किंवा धान्याचे परिमाण व प्रत या गोष्टी दर्शविल्या पाहिजेत.

कोणत्याही स्थानिक क्षेत्रातून वैरण किंवा धान्य काढून नेण्याची मनाई.

**५.** (१) कोणत्याही स्थानिक क्षेत्रात दुष्काळी किंवा टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे असे कलम ३, पोट-कलम (१) अन्वये [१] [राज्य] शासनाने जाहीर केल्यानंतर, आणि ज्या मुदतीत असा जाहीरनामा अंमलात राहील त्या मुदतीत, अशा दुष्काळी क्षेत्रातील किंवा टंचाईच्या क्षेत्रातील गरीब लोकांच्या हालांचे निवारण करण्याकरिता किंवा शेतकीच्या संरक्षणाकरिता किंवा सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्याकरिता अशा दुष्काळी क्षेत्रातून किंवा टंचाईच्या क्षेत्रातून कोणत्याही प्रकारची वैरण किंवा धान्य काढून नेण्यावर निर्बंध घालणे आवश्यक आहे अशी राज्य शासनाची खात्री झाल्यास, [१][राज्य] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, कोणत्याही वेळी असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, कोणत्याही व्यक्तीने अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या स्थानिक क्षेत्रातून जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा याबाबत त्याने अधिकृत केलेल्या अशा इतर अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय अशी वैरण किंवा धान्य काढून नेता कामा नये.

(२) असा निदेश देण्यात आल्यावर, अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या स्थानिक क्षेत्रातून कोणत्याही व्यक्तीने अशी वैरण किंवा धान्य काढून नेण्यासाठी [२] [पोट-कलम (१) मध्ये तरतूद केलेल्या रीतीस अनुसरून परवानगी मिळविल्याशिवाय अशी कोणतीही वैरण किंवा धान्य] काढून नेता कामा नये [३] [किंवा काढून नेण्याचा प्रयत्न करता] कामा नये.

प्रमाण किंमतीपेक्षा अधिक रक्कम वसूल करता येणार नाही.

**६.** (१) कोणत्याही प्रकारच्या वैरणीच्या किंवा धान्याच्या विक्रीबद्दल मोबदला म्हणून जी रक्कम देण्याचे कबूल केले असेल व जी प्रमाण किंमतीपेक्षा अधिक असेल ती रक्कम वसूल करता येणार नाही.

(२) जर अशी कोणतीही रक्कम देण्यात आली असेल तर, अशी रक्कम ज्या व्यक्तीस देण्यात आली त्या व्यक्तीकडून जिने ती दिली त्या व्यक्तीस ती वसूल करता येईल.

कलम ४ किंवा ५ याचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**७.** जी कोणतीही व्यक्ती, कलम ४ किंवा ५ याच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील ती, दोषी ठरविण्यात आली असता, दोन वर्षेपर्यंत मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल किंवा रु. १,००० पर्यंत द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

नियम.

**८.** [१][राज्य] शासनास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील.

---

१ विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९४१ चा, मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम १ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम २, तसेच सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम २ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

एच ८०५-५,०५० पु.-४.२०१४

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**

  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**

  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **पर्यवेक्षक**

  शासकीय ग्रंथागार, पैठण रोड, रेल्वे स्टेशनजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२ व २६५०३९५

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते